लोकरीचे ऊबदार कांबळे

फेरीदे वॉल्फ

लोकरीचे ऊबदार कांबळे

फेरीदे वॉल्फ

बर्फाच्छादित पर्वतांच्या मध्ये वसलेले छोटे गांव. तेथे बाब्बा झार्रहा रहात असे . तिच्याकडे जुने पण प्रशस्त, ऊबदार असे लोकरीचे कांबळे होते. त्यावर आरामात बसून तिने सांगितलेल्या गोष्टी ऐकणे हा गांवातील छोट्या मुलांचा आवडता छंद होता.

एक दिवस बाब्बा झार्रहाला, निकोलाईच्या पायमोज्याला भोक पडलेले दिसले. गोष्टी ऐकल्यानंतर मुले निघून गेली. बाब्बा झार्रहाने विचार केला की निकोलाईसाठी छान, ऊबदार पायमोजे विणावे . पण त्यासाठी लोकर कोठून मिळणार ? कारण या हिवाळ्यात खूपच बर्फ पडले होते. लोकर देण्यासाठी कोणी गांवात येण्याची शक्यताच नव्हती. लोकरीशिवाय थोडेच मोजे विणता येतात!

बाब्बा झार्रहा स्वतःशीच बोलली, “ प्रत्येक समस्येवर उपाय असतोच. जरा विचार करायला हवा."

काहीतरी विचार सुचावा म्हणून तिने चहा बनवावा असे ठरवले . चहाचे दोन तीन घोट पोटात जातात न जातात तो तिला उत्तम कल्पना सुचली. बाब्बा झार्रहा हर्षित झाली. काय केले पाहिजे हे तिच्या लक्षात आले.

लोकरीच्या कांबळ्यातून थोडी लोकर काढून पायमोजे विणता येतील की! ती मनांत म्हणाली.



रात्री पायमोजे तयार झाले . सर्वजण झोपले होते.
बर्फातून सावकाश चालत ती निकोलाईच्या घरी
पोचली. दरवाजातच तिने ते पायमोले ठेवून दिले,
.

काही दिवस लोटले. एक दिवस सकाळी पोस्टमन टपाल वाटण्यासाठी निघाला तेंव्हा त्याला टपालपिशवीवर एक मफलर गुंडाळलेला दिसला. वाटेने जातांना त्याने भेटेल त्या प्रत्येक व्यक्तीला विचारले :

“हा मफलर कुणी विणला हे माहीत आहे का?”

कुणालाच काहीही माहीत नव्हते.

शाळेच्या अध्यापकांना विस्तव पेटवण्यासाठी लाकडाच्या ढलप्या हव्या होत्या. ते लाकडांच्या ढिगाकडे गेले तो त्यांना तिथे विशिष्ट प्रकारे विणलेल्या हातमोज्यांची जोडी ठेवलेली दिसली. ते आश्चर्यचकित झाले.

मिसेस इवानोव यांना पाण्याच्या पंपाजवळ लोकरीचा एप्रन मिळाला. त्यांनी तो जोराने झटकला धुतलेल्या कपड्यांवर बसलेल्या कावळ्यांना झटकण्यासाठी.

लवकरच असे दिसले की किराणा मालाचे दुकान चालवणारा जुन्या, फाटक्या शालीऐवजी एक नवी, ऊबदार शाल पांघरू लागला होता.

मुलें जेंव्हा गोष्ट ऐकण्यासाठी येत तेंव्हा आता त्यांना लोकरीच्या कांबळ्यावर अगदी जवळ जवळ बसावे लागत होते.

दिवसेंदिवस गांवातल्या लोकांची उत्सुकता वाढतच जात होती. छोट्या ओल्गाला एक नवीन मऊमऊ बेबी कांबळे मिळाले होते. कसायानेही आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावरची सुरेख टोपी सर्वांना दाखवली.

आता बाब्बा झार्रहाच्या घरी मुलांना छोट्याशा कांबळ्यावर एकमेकांना चिकटूनच बसावे लागत होते.

शिंप्याची अशक्त, दुबळी मांजर एक आरामदायक कोट घालून गुरगुरतांना दिसली तेंव्हा गांवातल्या लोकांचे याबद्दलचे कुतूहल खूपच वाढले!

मुलांना बसण्यासाठी आता कांबळेच नव्हते .

हे रहस्य उलगडण्यासाठी गांवातील लोकांनी मेयरकडे मदत मागितली.

मेयर म्हणाले " बाब्बा झार्रहा नेहमी काय सांगते ते तुम्हाला माहीत आहे - प्रत्येक प्रश्नाला उत्तर असतेच."

पायमोजे, मफलर, विशिष्ट प्रकारचे हातमोजे, एप्रन, शाल, टोपी, बेबी कांबळे आणि कोट पांघरलेली मांजर या सर्व वस्तू जेंव्हा मुलांनी एकत्र पाहिल्या तेंव्हा ती मुले ओरडली " या सगळ्या गोष्टी बाब्बा झार्रहाच्या जुन्या कांबळ्यासारख्या दिसताहेत."

यावर निकोलाई बोलली, "पण तिच्याकडे आता कांबळे नाहीच."

मेयर एकदम म्हणाले, "अरेच्चा ! बाब्बा झार्रहाने आपल्या कांबळ्याची लोकर वापरून या सर्व वस्तू विणल्या आहेत. आता तिला आश्चर्यचकित करण्याची आपली पाळी आहे."

गांवातील प्रत्येक घरातील कांबळ्यातून थोडी थोडी लोकर काढून घेऊन एक कांबळे बनवले गेले आणि रात्री बाब्बा झार्हा झोपलेली असतांना ते कांबळे तिच्या दारात ठेवले गेले.

सकाळी बाब्बा झार्हाने दरवाजा उघडला तेंव्हा तिला आश्चर्याचा धक्काच बसला. विविध रंगांची इतकी लोकर तिने कधीच पाहिली नव्हती. त्या गठ्ठ्यावर मजकूर होता :

“आपल्या नव्या कांबळ्यासाठी"



पुढच्या वेळी जेंव्हा मुलें बाब्बा झार्रहाकडे गोष्ट ऐकण्यासाठी गेली तेंव्हा त्यांना बसण्यासाठी नवे रंगीबेरंगी कांबळे होते. त्याच्यावर बसून त्यांनी जी गोष्ट ऐकली ती होती एका गांवाची. त्या गांवातील लोक सर्व काही आपापसात वाटून घेत असत.

मुलांना मिठीत घेऊन बाब्बा झार्रहा त्यांना निरोप देते. तिला अलेक्झांडरच्या स्वेटरला पडलेले भोक दिसते. नवीन स्वेटर विणून अलेक्झांडरला चकीत करावे असा तिचा बेत होता. पण टेकड्यांवर आणि इतरत्र अजूनही खूपच बर्फ होते. कुठेही लोकर मिळण्याची शक्यता नव्हती.

बाब्बा झार्रहाला माहीतच होते की प्रत्येक प्रश्नाला उत्तर हे असतेच. तिने नव्या कांबळ्याकडे नजर टाकली आणि तिच्या चेहर् यावर स्मितहास्य उमटले.

बाब्बा झाराकडे एक सुरेख लोकरीचे कांबळे होते . त्यावर आरामात बसून तिच्या गोष्टी ऐकणे हा गांवातल्या मुलांचा अतिशय आवडता छंद होता. एकदा बाब्बा झाराच्या लक्षांत येतं की आपल्या आसपासच्या, शेजारच्या लोकांना नव्या गरम कपड्यांची फार गरज आहे . तिच्या कथावाल्या कांबळ्यातील लोकर उसवून घेऊन त्या लोकरीचे लोकांना गरज असलेले कपडे ती गुप्तपणे विणते . बघता बघता तिचे कांबळेच उरत नाही! या समस्येवरचा उपाय गांवकर् यांना माहीत आहे .

हार्दिक उदारतेचे चीज झालेले सांगणारी , काळजाला स्पर्श करणारी कहाणी - त्याचबरोबर मनोवेधक चित्रे, पारितोषिक विजेत्या "द ऑपोझिट" च्या इलस्ट्रेटरने काढलेली.

“द ऑपोझिट" साठीची प्रशंसा

एलेना ओड्रिझोला यांनी रेखलेली चित्रे अत्युत्कृष्ट , आकर्षक , शैलीदार, परंपरेपासून पूर्णपणे वेगळी

एक सुबक रत्न - द टाइम्स

अफाट कल्पनाशक्ती - गार्डियन

उच्च अभिरुचीदर्शक सर्व लक्षणे - स्टीफेन फ्राय